दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
Finolex PHILIPS SIEMENS HAVELLS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

लातूर वर्ष ३ रे अंक १३१ वा गुरूवार दि.१२ ऑक्टोंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# महिलांनो रस्त्यावर उतरा : शरद पवार

मुंबई : शरद पवार यांनी महिलांना अन्यायाविरोधात रस्त्यावर उतरण्याचे आवाहन केले. समाजात चुकीचे काही दिसले तर रस्त्यावर उतरा, सरकार केसेस टाकेल, पण तरीही घाबरू नका. सरकार बदलत असते, आपण त्या केसेस मागे घेतो, असे शरद पवार म्हणाले.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचा शरद पवार महिला मेळावा आज मुंबईत पार पडला. यावेळी महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे, खासदार सुप्रिया सुळे, अध्यक्ष शरद पवार यांच्यासह प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी महिलांना मार्गदर्शन केले.

शरद पवार म्हणाले, अनेक तास बसून देखील कुणी सभागृहाच्या बाहेर गेले नाही. सर्वांनी संघटनात्मक कामाबाबतची भूमिका मांडली आणि ऐकून देखील घेतली आहे. आपल्याला काही कार्यक्रम हाती घ्यायचे आहेत यामध्ये महिला आरक्षण, महागाई असे मुद्दे आहेत. आपण महिला आरक्षणाचा निर्णय घेतला होता.आरक्षण निर्णयामुळे स्पष्ट झाले की, महिला पुरुषांपेक्षा कमी नाहीत.आपण संरक्षण खात्यात आरक्षण देण्याचा निर्णय घेतला, त्यावेळी अनेकांचा विरोध होता. मात्र मी स्वत: मंत्री म्हणून तो निर्णय घेतला आणि आता तुम्हाला महिला सैन्यात दिसत आहेत. ही जमेची एका बाजूला परिस्थिती आहे, दुसरीकडे मणिपूरसारखी घटना समोर येते. त्यामुळे आपल्याला जागरूक राहावे लागणार आहे. जर आता असा प्रकार कुठे घडला तर आपल्या भगिनंनी रस्त्यावर उतरायला हवे. काय होईल तर ते केस टाकतील, विविध कलमे लावत असतात. तुम्ही चिंता करू नका, सरकार बदलत असते आणि आपण त्या केसेस काढून टाकत असतो.आता शाळा समायोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सावित्रीबाई फुले यांनी विरोध असताना शाळा काढली आणि आता शाळा बंद करणे योग्य नाही. असे होत असताना तुम्ही शांत बसत असाल तर हे योग्य



नाही. सरकारी नोकरीची कमतरता आहे. एका बाजूला नोक-या नाहीत आणि दुसरीकडे रिक्त जागा मोठ्या आहेत. आणि सरकार कंत्राटी पदावर नेमणुका करत आहेत हे योग्य नाही.

कंत्राटी पद्धतीमुळे महिलांना संधी मिळणार नाही सरकारी नोकरीमुळे कुटुंबात स्वास्थ्य असते, परंतु कंत्राटी पदावर नेमले तर तिथे आरक्षण नाही त्यामुळे मला खात्री आहे तिथे महिलांना संधी मिळणार नाही. त्यामुळे आपल्याला रस्त्यावर उतरावे लागेल. पावसाळी अधिवेशनात अनिल देशमुख यांनी प्रश्न विचारला होता की १ जानेवारीपासून १ मेपर्यंत किती महिला बेपत्ता आहेत? याचे उत्तर मिळाले की १९ हजार ५५३ महिला बेपत्ता आहेत. याचे रेकॉर्ड देखील आहे.

शाळांमध्ये गौतमी पाटीलचा कार्यक्रम का?

शाळा खाजगी कंपनीला देण्याचा यांनी निर्णय घेतला आहे. आता जी शाळा कंपनी दत्तक घेईल तिला तिचा वापर करता येईल. आता याचे उदाहरण द्यायचे झाले तर नाशिक जिल्ह्यातील एक शाळा मद्य कंपनीला दिली आणि त्यांनी त्या शाळेच्या ग्राऊंडमध्ये गौतमी पाटीलचा कार्यक्रम घेतला हे गंभीर आहे.

## उघड वक्तव्य करू नका; हायकमांडचा भाजपचा नेत्यांना इशारा

बंगळूर : कर्नाटकात जम बसवण्यासाठी भाजपने जेडीएस सोबत कर्नाटकात युती केली आहे. पण विचारांच्या फरकामुळे दोन्ही पक्षातील नाराजी उघडपणे दिसून येत आहे. दोन्ही पक्षात असंतोष निर्माण झाल्याचे सांगण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर भाजप हायकमांडने आपल्या नेत्यांना उघड वक्तव्य करू नका, असा स्पष्ट इशारा दिला आहे. आगामी लोकसभा निवडणूक लक्षात घेऊन भाजपने जेडीएस सोबत युती केली आहे. ज्येष्ठांच्या या निर्णयाचा भाजपच्या प्रत्येक नेत्याने आदर केला पाहिजे. युतीबाबत उघडपणे नाराजी, असंतोष व्यक्त करू नये. उघड नाराजी व्यक्त केल्यास तो पक्षशिस्तीचा भंग मानला जाईल, असा इशारा भाजपच्या हायकमांडने दिला आहे.भाजप-जेडीएस युतीबाबत सुरुवातीला आमदार एस. टी. सोमशेखर यांनी विरोध दर्शवला होता.

त्यानंतर खासदार डी. व्ही. सदानंद गौडा, बी. एन. बच्चेगौडा, माजी मंत्री एम. पी. रेणुकाचार्य, माजी आमदार पृथ्वीगौडा यांच्यासह राज्यातील अनेक नेत्यांनी युतीला उघड विरोध केला होता. या युतीमुळे जुन्या म्हैसूरमध्ये भाजपची सत्ता कमकुवत होईल. भाजपमध्ये वक्कलिग नेत्यांच्या म्हणण्यावर एकमत नाही. युतीची गरज नव्हती, अशी नाराजी भाजपच्या कर्नाटकातील नेत्यांकडून व्यक्त केली जात होती.

# साहित्यिक नवनाथ रणखांबे प्राईड ऑफ भारत या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित

## उद्देशरीं भारत देशातील प्रतिष्ठित व राष्ट्राला समर्पित सन्मान सोहळा संपन्न

पुणे /प्रतिनिधी :- भारत देशातील प्रतिष्ठित व राष्ट्राला समर्पित सन्मान सोहळा १५ वे अखिल भारतीय कर्तव्यम् प्रेरणा महासंमेलनात डिशनल डायरेक्टर जनरल ऑफ़ पोलिस महाराष्ट्र राज्य श्री. कृष्णाप्रकाश यांच्या हस्ते साहित्यिक विचारवंत नवनाथ आनंदा रणखांबे यांना त्यांनी केलेल्या विवध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यामुळे प्राईड ऑफ भारत या राष्ट्रीय पुरस्काराने आचार्य अत्रे रंगमंदिर , पिंपरी चिंचवड , पुणे येथे नुकतेच सन्मानित करण्यात आले . महत्त्वाचे म्हणजे राजपत्रानुसार आपल्या देशाचे नाव भारत झाल्यानंतर प्राईड ऑफ भारत या नावाने संस्थात्मक व स्वायत्त स्तरावर दिल्या गेलेला हा देशातील पहिला सर्वोच्च पुरस्कार ठरला आहे .

भारतीय सेनेतील अमर जवान ज्योतीला अभिवादन करून व पुष्पचक्र अर्पण करून कर्तव्यम् महासंमेलनाचा प्रारंभ झाला .भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात वायुसेना दिनानिमित्ताने भारतीय सेनेतील अमर बलिदानी शहीदांच्या परिवारातील वीरमाता व वीरपत्नी आणि राष्ट्रधर्मासाठी तत्पर कार्यवीरांना समाजात राहून विविध क्षेत्रात कर्तव्य



बजावत असतांनाच आपल्या विविध कलागुणांनी स्वतःचे व समाजाचे नाव उज्वल करणाऱ्या भारतातील लौकीकास पात्र गुणीजनास विविध प्रतिभावंताना याप्रसंगी गौरविण्यात आले.

यावेळी संमेलनाध्यक्ष संतोष भाऊ बारणे ( संस्थापक अध्यक्ष कर्तव्यम् सोशल फाऊंडेशन पुणे) , स्वागताध्यक्ष अतुल जे. निकम (संचालक नेहरू युवा केंद्र युवक कल्याण व क्रीडा मंत्रालय भारत सरकार) , संजीव जैन्थ ( संचालक ऋ २० सचिवालय श्रम एवं रोजगार मंत्रालय नवी दिल्ली भारत सरकार) , महाराज शिवाजी राजे जाधव, महाराज विजयसिंहराजे भोसले, ब्रिगेडियर राजेश गायकवाड (महासंचालक सैनिक कल्याण विभाग महाराष्ट्र राज्य), विशेष उपस्थितीमध्ये महावीर चक्र विजेता भारतीय सेना दिगेंद्र कुमार, एयर मार्शल / एयर व्हाईस भारतीय वायुसेनेचे भूषण गोखले , प्रदीप बापट आणि नितीन वैध , अप्पर आयुक्त तथा पणन संचालक सहकार महाराष्ट्र सुनील गो पवार , मुख्य संयोजक क्रांती कुमार महाजन इ. मान्यवर उपस्थित होते .

अत्यंत दिमाखदार व नेत्रदिपक पद्धतीने पार पडलेल्या या महासंमेलनाचे दैदिप्यमान आयोजन कर्तव्यम् सोशल फॉउंडेशन या संस्थेच्या मुख्य संयोजनात श्री. शंभूराज्याभिषेक ट्रस्ट , रेड स्वस्तिक सोसायटी , अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषद , मस्कटर्स ट्रैनिंग अकॅडेमी , एन.सी.आय.डी. , रेडियंट टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड या संस्थांच्या संयुक्त एकत्रिकरणातून करण्यात आले .

चि. आरुष



यास ८ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

-:शुभेच्छूक:-

स्वाती - दयानंद मारुती लोंढे (आई- वडील)
चतुराबाई - मारुती रघुनाथ लोंढे (आजी- आजोबा)
सरस्वती- रघुवीर मारुती लोंढे (चुलती- चुलता )
शारदा - शिवकुमार मोहनराव कांबळे (आत्या - काका)
भाऊ.शिवमानी,शिवम,निकिता ,संगीता.

# आमदार अभिमन्यू पवारांच्या संकल्पनेतील औशाच्या शिक्षणाचा नवा अध्याय राज्यभर आत्मसात होणार- जी.श्रीकांत

औसा - शिक्षणाचे महत्त्व काय आहे याचे उत्तम उदाहरण खुद्द मी आहे. माझे वडिल शेतकरी होते.माझ्या शिक्षणासाठी लागणारा खर्च पाहाता माझ्या नवीन साडी घेतली नाही. आणि याच शिक्षणासाठी शेती विकली आणि त्याच शेतात माझ्या आई - वडीलांनी मजुरी केली. या सर्व परिस्थितीत मी जिद्दीने शिक्षण घेतले आणि आज तुमच्यासमोर मी सनदी अधिकारी म्हणून उभा आहे केवळ आणि केवळ शिक्षणाच्या जोरावर ज्या शेत रस्त्याचा पॅटर्न राज्यभर गाजतोय त्या शेतरस्ते पॅटर्नला माझ्या कार्यकाळात हातभार लागला त्याच ते सर्व श्रेय आमदार अभिमन्यू पवार यांचे आहे. शेतरस्ते, पाणी या मूलभूत गरजा बरोबर शिक्षणही तेवढेच महत्त्वाचे म्हणून राज्यात शेतकऱ्यांचे जाळे निर्माण करणारे आमदार ग्रामीण शिक्षण व्यवस्थेतही औसा पॅटर्न करतील आमदार अभिमन्यू पवार यांच्या संकल्पनेतून व क्रिएटिव्ह फाऊंडेशनच्या पुढाकाराने राजमाता जिजाऊ शाळा माजी न्यारी हा स्तुत्य उपक्रम येथील विद्यार्थ्यांच्या कर्तुत्ववाचा डंका भविष्यात राज्यात गाजणार असा विश्वास छत्रपती संभाजीनगर चे मनपा आयुक्त जी. श्रीकांत यांनी व्यक्त केला ते लामजना येथे (दि.११) रोजी आमदार अभिमन्यू पवार यांच्या संकल्पनेतून व क्रिएटिव्ह फाऊंडेशनच्या पुढाकाराने साकारलेल्या राजमाता जिजाऊ शाळा माजी न्यारी या उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

या कार्यक्रमाला आलेले अधिकारी बहुतांश शेतकऱ्यांची मुले आहेत.शिक्षणाचे महत्व आपल्यामध्ये आत्मसात करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये जिद्द हावी आपली मुले शिक्षणात देहवेडी व पुढे काहीतरी घडवणार असा विश्वास आपल्या शेतकरी बापाला वाटला तर त्या मुलांच्या शिक्षणासाठी वेळप्रसंगी स्वतःची जमिन विकायची वेळ आली तर ती विका विशेषता मुलींसाठी हे करणे आवश्यक आहे. मुलगी वयात आली कि दहावी नंतर शिकू द्यायची नाही तिचे लग्न करायचा असा विचार अनेक पालकांचा असतो पण आता परिस्थिती बदलली आहे. जोपर्यंत मुलगी शिक्षणाला कंटाळून जाणार नाही तोपर्यंत तिला शिकवा तीचे शिक्षण पुर्ण झाल्यावरच तिचे लग्न करा. आमदार अभिमन्यू पवार यांनी जिल्हा परिषद शाळेतील शिक्षण व्यवस्था त्याचबरोबर विद्यार्थ्यांमध्ये खेळाडू वृती यावी तसेच हायटेक शिक्षण मिळावे म्हणून सुरू केलाला हा उपक्रम अत्यंत पथदर्शी आहे. शिक्षणाबरोबरच शाळेत मैदानी खेळ गाजवण्यासाठी क्रीडाणही आवश्यक असल्याने या उपक्रमाअंतर्गत याला प्राधान्य दिल्याने शिक्षक गुरुजींनी शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांमधील खेळाबद्दल असलेले कलागुण लक्षात घेऊन त्या धर्तीवर विद्यार्थी घडविणे तेवढेच गरजेचे आहे. आमदार अभिमन्यू पवार याचीही संकल्पना आगामी काळात याच मतदारसंघातील शिक्षण, खेळ व इतर




माध्यमातून येथील मुले राज्यात नवा औसा पॅटर्न केल्याशिवाय राहणार नाही.असे ते म्हणाले. यावेळी मंचावर जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार भरत सूर्यवंशी, गटविकास अधिकारी युवराज म्हेत्रे, क्रिएटिव्ह फाऊंडेशनचे सचिव सुहास पाचपुते,शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, तालुका शिक्षणाधिकारी गोविंद राठोड, भाजपचे तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, सभापती शेखर सोनवणे, हभप दतात्रय पवार गुरुजी, अॅड परिक्षीत पवार, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष किरण उटगे,काकासाहेब मोरे, सौ. पार्वती पवार, सौ. शोभा अभिमन्यू पवार, कल्पना ढविले, प्रभारी सरपंच बालाजी पाटील, मुख्याध्यापक जी आर भोजने, बी एस शिंदे, संजय बिराजदार, युवराज बिराजदार, प्रा सुधीर पोतदार, याकूब मिर्झा, अशोक दंडगुले, सचिन कांबळे,बालाजी शेळके, सत्तार मिर्झा आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन दिपक चाबुकस्वार यांनी केले.

माझे माहेर लातूर कुठल्याही सामाजिक कार्यक्रमास लातूरचे निमंत्रण आगत्याचे असते मीही लातूरच्या कार्यक्रमाला हजेरी लावतो माझ्या मुलीचा जन्म लातूर ला झाल्याने ती स्वताच्या नावासोबत लातूरकर लावते माझे व लातूरचे नाते लग्न झालेल्या मुलीसारखे आहे लग्न होऊन मुलगी जशी सासरी जाते तसेच माहेरच्या कुठल्याही कार्यक्रमास हजेरी लावते तसेच लातूर माझे माहेर असल्याचे आयुक्त जी. श्रीकांत यांनी सांगितले.

शिक्षणाच्या पलीकडे जाऊन पिढी घडवणार - आ अभिमन्यू पवार

ग्रामीण शिक्षणाचा कणा असलेल्या जिल्हा परिषद शाळेतील गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी राजमाता जिजाऊ शाळा माजी न्यारी हि संकल्पना आगामी काळात शिक्षणाच्या पलीकडे जाऊन पिढी घडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आमदार अभिमन्यू पवार म्हणाले शिक्षणासोबत संगणकीय ज्ञान माहिती तंत्रज्ञान तसेच मैदानी खेळ, यासह विविध उपक्रम यामध्ये राबविले जाणार आहेत प्रायोगिक तत्त्वावर मतदारसंघातील तीन जिल्हा परिषद शाळेत हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. यानंतर तो मतदारसंघातील ७७ शाळेमध्ये राबविण्यात येईल पारंपरिक खेळ, तंत्रज्ञानाचे शिक्षण याची जोड घालून आयएएस, युपीएससी अधिकाऱ्यांचे ऑनलाइन मार्गदर्शन या शाळेतील विद्यार्थ्यांना दिले जाणार असल्याचे यावेळी बोलताना आमदार अभिमन्यू पवार यांनी सांगितले.

सर्वतोपरी सहकार्य करणार - अनमोल सागर

जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार अभिमन्यू पवार व क्रिएटिव्ह फाऊंडेशनच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमाला सर्वतोपरी सहकार्य करण्याचा मी प्रयत्न करेन याचबरोबर हा उपक्रम जिल्हा भरातील शाळेच्या माध्यमातून कसा राबविता येईल यासाठी प्रयत्नशील राहणार असे सांगून जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

## संपादकीय....

# बिगुल वाजला!

केंद्रीय निवडणूक आयोगाने सोमवारी मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, मिझोराम आणि तेलंगणा या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला. या पाच राज्यांतील विधानसभेची मुदत संपत असून, त्याआधीच निवडणूक आयोगाने या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला आहे. छत्तीसगडमध्ये दोन टप्प्यांत निवडणूक पार पडणार आहे तर मध्य प्रदेश, राजस्थान, तेलंगणा आणि मिझोराममध्ये एका टप्प्यात निवडणूक घेतली जाणार आहे. या पाचही राज्यांच्या निवडणुकांची मतमोजणी ३ डिसेंबर रोजी होईल. ५ डिसेंबरपर्यंत या पाच राज्यांतील सर्व निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईल. आगामी विधानसभा निवडणुकांसाठी ६७९ विधानसभा मतदारसंघांत सुमारे १ लाख ७७ हजार मतदान केंद्रे उभारली जातील. शिवाय पाच राज्यांच्या ९४० हून अधिक आंतरराज्य चेक पोस्टवर बेकायदेशीर रोकड, दारू, मोफत वस्तू आणि ड्रग्ज वाहतूक हालचालींवर नियंत्रण ठेवण्यास आम्ही सक्षम आहोत असे मुख्य निवडणूक आयुक्त राजीवकुमार यांनी म्हटले आहे. या पाचही राज्यांत सत्ताधारी विरुद्ध काँग्रेस असा सामना रंगणार आहे. राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये काँग्रेसची सत्ता आहे. भाजप त्यांना कडवी झुंज देईल अशी अपेक्षा आहे.मध्य प्रदेशमध्ये भाजपची सत्ता असून ते आपली सत्ता टिकविण्यासाठी पूर्ण ताकदीने प्रयत्न करतील. तेलंगणामध्ये केसीआर यांची भारत राष्ट्र समिती सत्तेत आहे. तेथे काँग्रेस विरुद्ध भाजप सामना रंगण्याची शक्यता कमी आहे. मध्य प्रदेशमध्ये ६४ हजार ५२३, राजस्थानमध्ये ५१ हजार ७५६, छत्तीसगडमध्ये २४ हजार १०९, तेलंगणामध्ये ३५ हजार ३६५ तर मिझोराममध्ये १२७२ मतदान केंद्रे आहेत. मध्य प्रदेशमध्ये ५.६ कोटी, राजस्थानमध्ये ५.२५ कोटी, तेलंगणामध्ये ३.१७ कोटी, छत्तीसगडमध्ये २.०३ कोटी तर मिझोराममध्ये ८.५२ लाख मतदार आहेत. भाजपच्या नेतृत्वाखालील सत्ताधारी एनडीए आणि विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीची मोट किती भक्कम आहे ते या विधानसभा निवडणुकीतून स्पष्ट होईल. या निवडणुकीतील यशापयशावर दोन्ही आघाड्यांची पुढील वर्षी होणा–या लोकसभा निवडणुकीसाठीची रणनीती अवलंबून राहील. मिझोराम विधानसभेचा कार्यकाळ १७ डिसेंबर रोजी तर उर्वरित चारही राज्यांच्या विधानसभेचा कार्यकाळ पुढील वर्षी जानेवारीत संपणार आहे. आगामी लोकसभा निवडणुकांची रंगीत तालीम म्हणून या पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांकडे पाहिले जात आहे. त्यामुळे देशभरात पुन्हा एकदा निवडणुकीचे वारे सुरू झाले आहे. विधानसभा निवडणुकीत आघाडी घेऊन आगामी लोकसभा निवडणुकीला सामोरे जाता येईल असा विरोधक आणि सत्ताधा–यांचा पवित्रा असल्यामुळे या राज्यांतील निवडणुकांची रणधुमाळी चांगलीच गाजण्याची शक्यता आहे. या पाच राज्यांपैकी राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये काँग्रेसची सत्ता आहे. तेथे काँग्रेसला आपली सत्ता टिकवण्याचे मोठे आव्हान राहील. राजस्थानमध्ये मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी पक्षाला एकसंध बांधून ठेवण्याचे काम केले असले तरी, त्यांच्यासमोर पक्षातीलच नेते सचिन पायलट यांचे आव्हान असणार आहे. कारण पायलट यांनी अनेकवेळा मुख्यमंत्रिपदाची महत्त्वाकांक्षा बोलून दाखविली आहे. २०१८ मध्ये विधानसभेच्या निवडणुका झाल्या तेव्हा सचिन पायलट राजस्थान काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष होते. राज्यात भाजपची सत्ता असताना पायलट यांनी संपूर्ण राज्य पिंजून काढत काँग्रेसचे संघटन वाढवण्यावर भर देत पक्षाची सत्ता आणली होती.

मात्र मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करताना पेच निर्माण झाला. काँग्रेसने तरुणतुर्क पायलट यांच्याकडे राज्याची धुरा आणि ज्येष्ठ नेते गेहलोत यांच्याकडे पक्षाची धुरा सोपविण्याची गरज होती. परंतु काँग्रेसने पुन्हा एकदा जुने कार्ड वापरत गेहलोत यांच्याकडे मुख्यमंत्रिपद सोपवले. पायलट यांना उपमुख्यमंत्रिपद देण्यात आले. पायलट यांची नाराजी काँग्रेसला भारी पडू शकते. मध्य प्रदेशमध्ये भाजपने निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच केंद्रातील बड्या नेत्यांना रिंगणात उतरवले आहे. तेथे भाजपने ५७ उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली असून त्यात विद्यमान मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांचाही समावेश आहे. राज्याचे गृहमंत्री नरोत्तम मिश्रा यांनाही दतिया मतदारसंघातून संधी देण्यात आली आहे. भाजपने राजस्थान विधानसभेसाठी ७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली परंतु त्यात माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे, केंद्रीय मंत्री गजेंद्रसिंह शेखावत, अर्जुन राम मेघवाल यांचा समावेश नाही. पहिल्या यादीत राजेंच्या दोन समर्थक आमदारांना उमेदवारी नाकारण्यात आली आहे. निवडणुका जाहीर झाल्या की मतदानपूर्व अंदाज जाहीर करण्यासाठी अनेक संस्थांचे पीक चांगलेच फोफावते. हे अंदाज तंतोतंत खरे निघतात असे नाही. परंतु मतदानपूर्व आणि मतदानोत्तर अंदाज जाहीर करण्यासाठी स्पर्धा लागल्याचे दिसते. तेलंगणामध्ये भारत राष्ट्र समिती सत्तेवर आहे.मुख्यमंत्री के. चंद्रशेखरराव सलग तिस–यांदा सत्तेवर येण्यासाठी प्रयत्नशील राहतील. बीआरएसला (भारत राष्ट्र समिती) भाजप आणि काँग्रेस कडवी लढत देतील. एका सर्वेक्षणानुसार तेलंगणात काँग्रेसला मोठी आघाडी मिळण्याची शक्यता आहे. काँग्रेसला एकूण ३९ टक्के, बीआरएसला ३८ टक्के तर भाजपला १६ टक्के मते मिळण्याची शक्यता आहे. काँग्रेसला ४८ ते ६० जागा मिळू शकतात. छत्तीसगडमध्ये सत्ताधारी काँग्रेसला ४५ टक्के तर भाजपला ४४ टक्के मते मिळू शकतात. म्हणजे तेथे काट्याची टक्कर होणार असे दिसते. ९० जागांपैकी काँग्रेसला ४५ ते ५१, भाजपला ३९ ते ४५ जागा मिळू शकतात. राजकारण हे विकासाचे साधन ठरले पाहिजे परंतु वरचेवर राजकारणाचे स्वरूप बदलत चालले आहे. निवडणुका लागल्या की अनेक राजकीय पक्ष जनतेला प्रलोभने दाखवून सत्ता लाटण्याच्या प्रयत्नात दिसतात. सत्तेवर आल्यानंतर दिलेली आश्वासने सोयिस्करपणे विसरली जातात. खरे तर आज राजकारणाच्या पलिकडे जाऊन विचार करण्याची क्षमता विकसित होण्याची गरज आहे. आगामी निवडणुकांत त्याचे दर्शन होईल ही अपेक्षा.

# जुन्या पेन्शनचा हुकमी एक्का

गेल्या काही दिवसांपासून जुनी पेन्शन योजना म्हणजेच ओल्ड पेन्शन स्कीम (ओपीएस) लागू करण्याची मागणी केली जात आहे. 'नॅशनल मूव्हमेंट फॉर ओल्ड पेन्शन स्कीम' मार्फत १ ऑक्टोबर रोजी दिल्लीच्या रामलीला मैदानावर पेन्शन शंखनाद महारॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये २० राज्यांतील लाखो कर्मचारी सहभागी झाले होते. नॅशनल मूव्हमेंट फॉर ओल्ड पेन्शन स्कीमच्या नेतृत्वाखाली हे आयोजन करण्यात आले होते. त्यात विरोधकांचा देखील सहभाग होता. या रॅलीचा उद्देश सध्याच्या राष्ट्रीय पेन्शन योजनेऐवजी जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी केंद्रावर दबाव आणणे हा होता. कर्मचा–यांचा जुन्या पेन्शन योजनेकडे कल असून त्यांना नवीन पेन्शन योजना नको नसल्याचे मोठ्या प्रमाणात झालेल्या निदर्शनांवरून स्पष्ट झाले आहे. यातील कर्मचा–यांचा सहभाग पाहून केंद्र सरकारवर देखील दबाव वाढला आहे. या गर्दीवरून असे दिसून येते की, या मुद्याचा परिणाम या वर्षी होणा–या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांवरच होणार नाही तर २०२४ मध्ये होणा–या लोकसभा निवडणुकांवरही होणार आहे. त्यामुळेच जुन्या पेन्शन स्कीमचा आढावा घेण्यासाठी समिती स्थापन केली आहे. केंद्र सरकारचा हा निर्णय विरोधीशासित राज्य छत्तीसगड, झारखंड, राजस्थान, पंजाब आणि हिमाचल प्रदेशने जुनी पेन्शन योजना लागू झाल्यानंतर घेतला. उल्लेखनीय बाब म्हणजे, २००४ मध्ये यूपीए सरकारने जुन्या योजनेच्या जागी नवीन पेन्शन योजना लागू केली होती. ती शेअर बाजार आणि इतर गुंतवणुकीवर आधारित आहे. यातील परतावा शेअर बाजाराच्या स्थितीनुसार दिला जातो. जुन्या पेन्शन योजनेमध्ये निवृत्तीच्या वेळी शेवटच्या मूळ वेतनाच्या ५० टक्क्यांपर्यंत निश्चित पेन्शन उपलब्ध असते.एनपीएसमध्ये निवृत्तीच्या वेळी निश्चित पेन्शनची हमी नसल्याने कर्मचा–यांना ती नको आहे. जुन्या पेन्शन योजनेत कर्मचा–यांच्या पगारातून कोणतीही कपात केली जात नव्हती, तर एनपीएसमध्ये कर्मचा–यांच्या पगारातून १० टक्के कपात केली जाते. इतकेच नव्हे तर नवीन पेन्शन योजनेत ग्रॅच्युइटी आणि भविष्य निर्वाह निधी उपलब्ध नाही. जुन्या पेन्शन योजनेत कर्मचा–यांना ही सुविधा मिळते. जुन्या पेन्शन योजनेचे इतर अनेक फायदे आहेत. यामध्ये सेवानिवृत्तीनंतर कर्मचा–यांना वैद्यकीय भत्ता आणि वैद्यकीय बिलांची सुविधाही दिली जाते आणि सेवानिवृत्त कर्मचा–यांना २० लाख रुपयांपर्यंत ग्रॅच्युइटी रक्कमही मिळते. या योजनेंतर्गत कर्मचा–याला निवृत्तीच्या वेळी निम्म्या पगाराएवढी पेन्शन मिळते, जी तत्कालीन प्रचलित वेतनश्रेणी आणि महागाई निर्देशांकानुसार निर्धारित केली जाते. तसेच कर्मचा–याचा मृत्यू झाल्यास ही रक्कम त्याच्या कुटुंबीयांना दिली जाते.निवृत्तीपश्चात मिळणारी पेन्शन ही म्हातारपणीची काठी मानली जाते. कुटुंबासाठीचे सुरक्षाकवच म्हणून त्याकडे पाहिले जाते. सबब हा विषय तर्क आणि तथ्याच्या निकषावर तासून पाहणे गरजेचे आहे. सरकारला आर्थिक ओझ्याची चिंता असेल तर खासदार, आमदारांसाठी 'एक नेशन एक पेन्शन' का नको? अनेक स्पर्धा आणि पात्रतेचे निकष पूर्ण केल्यानंतर सरकारी विभागात संपूर्ण आयुष्य व्यतित करणा–या व्यक्तीला दहा टक्के वेतन कपातीनंतर देखील त्याचा वृद्धापकाळ सुरक्षित नसल्याचे दिसत आहे. आपल्या देशात सुमारे ८५ टक्के खासदार कोट्यधीश आहेत आणि हे माननीय केवळ ६०० रुपयांची सामाजिक सुरक्षा पेन्शनच्या आधारे लोकांना जीवन जगण्याचा सल्ला देतात. तसेच एनपीएसला अधिक चांगले असल्याचे सांगतात. राज्यांचा विचार केल्यास सुमारे २० प्रांत असे आहेत की तेथे माजी आमदारांना खासदारांपेक्षा अधिक पेन्शन दिले जाते. मणिपूरमध्ये एका माजी आमदाराला ७० हजार रुपयांची मूळ पेन्शन मिळते. मूळ पेन्शनमध्ये अन्य भत्ते जोडले तर पेन्शनची रक्कम दुप्पट होते. त्यामुळे पेन्शनवरून असंतोष आणि राजकारण वाढत असून यात आश्चर्य वाटण्यासारखे नाही. उलटपक्षी सरकारला विचार करण्याची पद्धत बदलावी लागणार आहे. काही काळापूर्वी राजस्थानमध्ये जुनी पेन्शन देण्याची घोषणा करण्यात आली होती, ज्याचे तेथील कर्मचा–यांनी मनापासून स्वागत केले होते. हिमाचल प्रदेशातील कर्मचारीही यामुळे खुश आहेत. छत्तीसगडमध्येही हीच परिस्थिती आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी जुन्या योजनेचे समर्थन करत केंद्र सरकारला दिल्लीतील कर्मचा–यांना जुन्या योजनेनुसार पेन्शन जाहीर करण्याची विनंती केली आहे. इकॉनॉमिक को–ऑपरेशन अँड डेव्हलपमेंट'च्या पेन्शन मार्केट अहवालानुसार अनेक देशांत पेन्शन फंडसाठी जीडीपीच्या १५ ते ४० टक्के खर्च केला जातो. भारतात हे प्रमाण केवळ ३ टक्के इतके आहे. त्यामुळे सरकारी बजेटमध्ये पेन्शनचा खर्च वाढवावा लागेल.एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, जगातील सर्वाधिक तरुणांचा देश असणारा भारत हा अशा ज्येष्ठ नागरिकांचाही देश आहे, ज्यांनी आपले तारुण्य सरकारी कामकाजात व्यतित केले. नवीन पेन्शन




केंद्र सरकार 'ओपीएस'ला रेवडी म्हणत आहे, त्याचवेळी आरबीआयच्या आकडेवारीनुसार, आर्थिक वर्ष २०१२–१३ नंतर बँकांनी कॉर्पोरेट घराण्यांकडे असलेली १५ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक थकबाकी ही बुडीत दाखविली असून त्यापैकी केवळ १९ टक्के वसुली झाली आहे. नवीन पेन्शननुसार दोन लाखांचे वेतन असणा–या लोकांना केवळ पाच ते दहा हजार रुपये निवृत्तिवेतन मिळणार आहे. ज्यांनी २० ते ३५ वर्षे सरकारसाठी काम केले, त्यांना निवृत्तीनंतरही वृद्धापकाळात बाजाराच्या भरवशावर सोडून देणे कितपत योग्य आहे? 'द ऑर्गनायझेशन फॉर स्कीम ही केंद्र सरकारला योग्य वाटत असेल तर खासदार, आमदारांना देखील हीच योजना लागू करायला हवी. केंद्राने या विषयावर तातडीने विचार करायला हवा. आगामी निवडणुकांमध्ये केंद्र सरकारच्या धडाकेबाज प्रचारतंत्राचा सामना करण्यासाठी विरोधकांच्या भात्यात असणा–या बाणांमध्ये जुनी पेन्शन हा एक महत्त्वाचा बाण असणार आहे. हिमाचल प्रदेशातील निवडणुकांच्या रणसंग्रामात या बाणाने भाजपचे दिग्गज धुरंधर धारातीर्थी पडलेले पाहायला मिळाले आहे. आता पुन्हा एकदा हा मुद्दा तापवून विरोधकांनी भाजपाची डोकेदुखी वाढवली आहे.

# दिल्लीपुढे मान तुकवण्याची परंपरा..

दिल्लीत येणे अजित पवार टाळत असले तरी एकनाथ शिंदे वा फडणवीस यांच्याप्रमाणे त्यांचेही भवितव्य दिल्लीतच ठरणार आहे. महेश सरलष्कर दिल्लीत येणे अजित पवार टाळत असले तरी एकनाथ शिंदे वा फडणवीस यांच्याप्रमाणे त्यांचेही भवितव्य दिल्लीतच ठरणार आहे. आगामी लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपसाठी उत्तर प्रदेश आणि गुजरा–तपेक्षाही महाराष्ट्र हे राज्य अधिक महत्त्वाचे असल्याने, तोवर तरी राज्याची सूत्रे दिल्लीतूनच हलणार.. शिवसेनेच्या मुख्यमंत्रीपदाचा काळ वगळला तर राज्याचे खरे सत्ताकेंद्र दिल्ली हेच होते. बराच काळ काँग्रेसचे मुख्यमंत्री होते, त्यांना हायकमांडचा आदेश मानावा लागे. 'दिल्लीपुढे मान तुकवतात आणि राज्यात तोरा दाखवतात', असे काँग्रेसच्या नेत्यांबद्दल कुत्सितपणे म्हटले जायचे. हीच परंपरा आता सुरू राहिलेली आहे, फक्त नेते बदलले आ–हेत. महायुतीतील नेतृत्वाचा दिल्लीवाऱ्यांचा हिशेब मांडला तर ते राज्यात कमी आणि राजधानीत जास्त असल्याचे आढळेल. बऱ्याच वेळा त्यांच्या दिल्लीवाऱ्या गुप्त राहतात. ते '६–अ' कृष्ण मेनन मार्गावरील केंद्रीय गृहमंत्री अमित शहांच्या सरकारी निवासस्थानी मागच्या दाराने कधी जातात आणि कधी परततात हे कळतही नाही. पण प्रत्येक दिल्लीवारीतून त्यांची अगतिकता वाढत गेल्याचे जाणवते.राज्यातील महायुतीच्या तीनही नेत्यांमध्ये सुरू असलेल्या मुख्यमंत्रीपदाच्या स्पर्धेत बहुधा विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना मुंबईपेक्षा दिल्ली अधिक सुरक्षित वाटत असावी. ते अधूनमधून दिल्लीत मुक्काम ठोकतात. दोन दिवसांपूर्वी शिंदेंनी दिल्लीत राहून, महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था सुधारण्यासाठी आढावा बैठक घेतली. प्रशासकीय अधिकारी मुंबईत आणि मुख्यमंत्री दिल्लीत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात शासनाचा प्रमुख कुठूनही काम करू शकतो हे खरेच. कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडोंचे विमान बिघडले म्हणून दोन दिवस त्यांनी भारतात राहून देशाचा कारभार केला. मुख्यमंत्री शिंदे आणि ट्रुडो यांच्यातील फरक इतकाच की, कॅनडात बसून कोणीही ट्रुडोच पंतप्रधान राहतील असे म्हणत नव्हते. इथे मात्र उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुंबईत बसून 'शिंदेच मुख्यमंत्री राहतील' अशी ग्वाही देत होते. राज्याचे दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शिंदेंना खूपच त्रास दिला असे दिसते. अजित पवार नाराज होत असतात. याहीआधी ते रुसून बारामतीला जाऊन बसले होते. तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या सरकारचा अर्थसंकल्प सादर कोण करणार असा प्रश्न निर्माण झाला होता. मग शरद पवारांनी, जयंत पाटील अर्थसंकल्प मांडतील असा पर्याय ठेवल्याने अजित पवारांचा नाइलाज झाला असे म्हणतात. आत्ताचा अजित पवारांचा राजकीय आजार पालकमंत्री पदांपुरता सीमित होता की, मुख्यमंत्रीपदाच्या मागणीचा विषाणूही शिरला होता, हे शिंदे वा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सांगू शकतील. गेल्या आठवड्यात मंत्रिमंडळाच्या बैठकीला अजित पवार गैरहजर राहिल्याने त्याच रात्री या द्वयीने दिल्लीत मागच्या दाराने '६–अ'मध्ये प्रवेश केला होता.उपमुख्यमंत्री अजित पवारांनी 'विठ्ठला'ची (आता हुकूमशहा!) साथ सोडली तेव्हा भाजपकडून दोन आश्वासने दिली गेली असे म्हणतात. पुण्याचे पालकमंत्रीपद आणि मुख्यमंत्रीपद. सत्तेत येऊन, दिल्लीचे ऐकूनही दोन्ही आश्वासने पूर्ण होत नसल्याने अजित पवार रुसून बसले. त्यांची समजूत काढण्यासाठी शिंदे–फडणवीस दिल्लीला धा–वले. एका रात्रीत पालकमंत्री ठरले. पुण्याचे पालकत्व अजित पवारांकडे आले. आता दुसऱ्या आश्वासनाचे काय झाले, असे अजित पवार विचारत आहेत. मला मुख्यमंत्री करा, लोकसभेच्या ४२ जागा जिंकून देतो, अशी खात्री अजित पवारांनी भाजपच्या नेतृत्वाला दिली होती असेही म्हटले जाते. अजित पवारांनी मुख्यमंत्री होण्यासाठी 'विठ्ठला'ला सोडले असेल तर या पदासाठी ते जंगजंग पछाडणारच. हे पाहता विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिल्लीत ठाण मांडले तर कोणाला वावगे वाटू नये. काही महिन्यांपूर्वी ते पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या भेटीसाठी सहकुटुंब दिल्लीत दोन दिवस राहिले होते. स्वत:चे मुख्यमंत्रीपद वाचवणे, आपल्या नेत्यांची महामंडळांवर वर्णी लावणे, काहींना मंत्री बनवणे ही लक्ष्ये शिंदेंना पूर्ण करावी लागतील. पण हे दिल्लीतील नव्या हायकमांडच्या मर्जीवर अवलंबून आहे. शिंदेंच्या पक्षाचे नाव 'शिवसेना'च असले तरी त्यांचे सत्ताकेंद्रही आता दिल्ली झाले आहे.मोदी–शहांनी अजित पवार यांना मुख्यमंत्रीपदाचे आश्वासन दिले असेल तर शिंदेंचे काय होणार हा प्रश्न असेल. पण त्याहूनही महत्त्वाचा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांचे कार्यक्षेत्र दिल्ली असेल की मुंबई? 'तुम्ही दिल्लीत जाणार का', असा प्रश्न फडणवीस यांना अधूनमधून विचारला जातो. त्यांना पुन्हा मुख्यमंत्री व्हायचे आहे. त्यासाठी ते राज्यात राहू इच्छितात. पण त्यांची इच्छा मोदी–शहांना किती मान्य असेल हे माहिती नाही. महाराष्ट्रामध्ये मराठा–ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून वातावरण तापू लागले असताना राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची धुरा ब्राह्मणेतर नेत्याकडे देणे भाजपसाठी अधिक सोयीचे आणि उपयुक्त ठरू शकते. शिवाय, राज्यात भाजपने पाच वर्षे ब्राह्मण मुख्यमंत्री दिलाच होता. आत्ता राज्याच्या राजकारणात सक्रिय असलेल्या फडणवीसांना दिल्लादौरा करावा लागतो पण म्हणून त्यांना दिल्ली पसंत असेल असे नाही. दिल्ली अजित पवारांनाही आवडत नाही, ते दिल्लीत फार क्वचित येतात. महायुतीत सहभागी झाल्यानंतर त्यांना मोदींनी बोलावलेल्या 'एनडीए'च्या बैठकीसाठी दिल्लीत यावे लागले होते! शनिवारी झालेल्या जीएसटी परिषदेच्या बैठकीला त्यांच्याऐवजी दीपक केसरकर आले. अजित पवार उपमुख्यमंत्री झाले, तेव्हा केसरकरांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले होते. त्यामागील त्यांची आतुरता खूप व्हायरल झाली होती. दिल्लीत येणे अजित पवार टाळत असले तरी त्यांचे भवितव्य दिल्लीतच ठरणार आहे. त्यांना सध्या दोन आघाड्यांवर लढाई लढावी लागत आहे. भाजपच्या नेतृत्वाला स्वत:ची उपयुक्तता सिद्ध करून दाखवावी लागेल आणि राष्ट्रवादी काँग्रेसची केंद्रीय निवडणूक आयोगातील लढाईही जिंकावी लागेल. शरद पवारांचे प्रभावक्षेत्र राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी दिल्लीविरोधात लढाई लढली होती. काँग्रेसबाहेर पडून स्वत:चा पक्ष काढला, राज्यात सत्ता राबवली. दिल्लीत स्वतंत्र प्रभावक्षेत्र निर्माण केले. हे प्रभावक्षेत्र वाचवण्याचा प्रयत्न पवार आत्ता करताना दिसतात. अजित पवारांनी पक्षावर दावा करून स्वत:ला राष्ट्रीय अध्यक्ष घोषित केल्यामुळे पक्षावरील वर्चस्वाचा वाद निवडणूक आयोगाला सोडवावा लागणार आहे. शुक्रवारी झालेल्या पहिल्या सुनावणीमध्ये दोन्ही बाजूंच्या वकिलांनी प्राथमिक मुद्दे मांडणे अपेक्षित होते. नेत्यांना उपस्थित राहण्याची गरज नव्हती. पण शरद पवारांनी आयोगाच्या कार्यालयात हजेरी लावून सगळ्यांना आश्चर्यचकित केले. पवारांसारख्या मुरब्बी नेत्यासमोर सुनावणी घेताना तीनही केंद्रीय आयुक्तांना किती दक्ष राहावे लागले असेल याची कल्पना करता येईल. केंद्रीय निवडणूक आयोगासमोरील सुनावणीच्या आदल्या दिवशी पवारांनी दिल्लीत विस्तारित कार्यकारिणीची बैठक घेतल्यामुळे राजकीय वातावरण निर्मिती झाली. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पक्षाच्या नऊ आमदारांना अपात्र ठरवण्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका निवडणूक आयोगाच्या सुनावणीतही महत्त्वाची ठरू शकेल. शिवसेनेच्या वर्चस्वाच्या लढाईत पक्ष व चिन्ह शिंदे गटाला मिळाले होते. हीच लढाई आता राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये चालू आहे. चिन्ह गेले तरी लोक आपल्यासोबत असल्याचे पवारांनी पक्षाच्या बैठकीत सांगितले आहे. निवडणूक चिन्ह 'घड्याळ' गमावले तर राष्ट्रीय राजकारणामध्ये संदर्भहीन होण्याचा धोका असू शकतो, तो टाळण्यासाठी पवार दक्षता घेत असावेत. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या सुनावणीआधी दोन तास पवार यांनी काँग्रेसचे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या निवासस्थानी राहुल गांधी व खरगे यांच्याशी महाविकास आघाडीच्या लोकसभा निवडणुकीच्या रणनीतीसंदर्भात चर्चा केली.आगामी लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपसाठी उत्तर प्रदेश आणि गुजरातपेक्षाही महाराष्ट्र अधिक महत्त्वाचे असेल. त्यामुळे निदान लोकसभेची निवडणूक होईपर्यंत तरी राज्याच्या राजकारणाची सूत्रे दिल्लीतूनच हलवली जातील असे दिसते.



# राज्यसरकार ते केंद्र सरकार असा पाठपुरावा करून ऐकतीस कोटी अठ्याऐंशी लाख पन्नास हजार मंजूर पुन्हा वैभवजी गिते अत्याचार पीडित कुटुंबियांच्या मदतीला धाऊन आले





मुंबई (प्रतिनिधी)दि.दलीत पॅंथरच्या वर्धापन दिनी राज्यात झालेल्या६३२खून प्रकरणात सर्व कुटुंबियांचे पुनर्वसन करून दाखवेन अन्यथा स्वतःच्या पिस्तुलातून गोळ्या झाडून आत्महत्या करेन अशी घोषणा वैभवजी गिते यांनी केली होती. अनुसूचीत जाती अनुसुचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा१९८९नियम१९९५ अंतर्गत दाखल गुन्ह्यांमध्ये अत्याचार पीडित व्यक्तींना शासनाकडून अर्थसहाय्य दिले जाते.तसेच गंभीर गुन्ह्यातील पीडितांचे पुनर्वसन देखील केले जाते. परंतु११महिन्यांपासून शासनाने हे अनुदान राज्यातील कोणत्याही जिल्ह्याला पाठवले नसल्याने शेकडो प्रकरणे संबंधीत जिल्हाधिकारी यांनी जील्हा दक्षता व नियंत्रण समितीच्या बैठकीमध्ये मंजूर करूनही निधी अभावी प्रलंबित होती.यामुळे पीडित व्यक्ती,सामजिक कार्यकर्ते,संस्था संघटना यांच्याकडुन सहाय्यक आयुक्त समाजकल्याण कार्यालयांमध्ये जाऊन वारंवार विचारणा करून शासनाच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली जात होती. नॅशनल दलित मुव्हमेंट फॉर जस्टिस या संघटनेचे राज्य सचिव वैभव गिते यांच्याकडे राज्यातील अनेक अत्याचार पीडित व्यक्तींनी अनुदान न मिळाल्याने तक्रारी केल्या होत्या.याची दखल घेऊन नॅशनल दलित मुव्हमेंट फॉर जस्टिस या संघटनेचे राज्य महासचिव ड.केवलजी उके यांच्या मार्गदर्शनात राज्य सचिव वैभव गिते यांनी प्रथम राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव सुमंत भांगे यांची भेट घेऊन चर्चा केली असता केंद्राचे पन्नास टक्के रक्कम आली नसल्याने राज्याचे पन्नास टक्के निधी वितरीत करण्यास अडचण येत असल्याचे सांगितले. त्यानंतर वैभव गिते यांनी उद्योग विभागाचे प्रधान सचिव तथा समन्वय अधिकारी ट्रॅासिटी क्ट हर्षदीप कांबळे यांची भेट घेत५०कोटी निधी तात्काळ वितरित करण्याची विनंती केली.तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. ही बाब राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग दिल्ली भारत सरकारच्या निदर्शनास आणून देत शासनास अहवाल मागण्याची विनंती केली.याची तात्काळ दखल घेत राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग पुणे यांनी सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे यांना १५ दिवसात अहवाल मागितला यानंतर वैभव गिते यांनी दिली येथे जाऊन केंद्र शासनाचे सचिव,उपसचिव यांची भेट घेऊन निवेदन देत चर्चा केली. शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने ३१८८५०००० एकतीस कोटी अठ्याऐंशी लाख पन्नास हजार रुपये मंजूर करून वितरित केले आहेत. त्यामूळे जातीय अत्याचारामध्ये दबलेल्या पिचलेल्या अत्याचार पिडीतांना मोठा दिलासा मिळणार आहे. हा निधी मंजूर करून आणण्यासाठी राज्यसरकार ते केंद्रसरकार व विधान भवन ते संसदभवन,राज्य शासनाचे सचिव ते केंद्र सरकारचे सचिव सामाजिक न्याय विभाग ते वित्त विभाग असा खडतर पाठपुरावा वैभव गिते यांनी केला आहे. यापूर्वी देखील वैभव गिते यांनी ट्रॅासिटी क्टच्या अंमलबजावणीसाठी प्रधान सचिव उद्योग व ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव डॉ हर्षदीप कांबळे यांची ट्रॅासिटी क्टच्या नोडल ऑफिसर म्हणून नियुक्ती होण्यासाठी पाठपुरावा करून नियुक्ती आणली. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदासजी आठवले यांची भेट घेऊन लक्ष घालण्याची विनंती वैभवजी गिते यांनी केली होती. राज्याचे मुख्यमंत्री यांच्या अंतर्गत राज्यस्तरीय दक्षता व उच्चाधिकार नियंत्रण समितीची स्थापना करायला लावली आहे.शासनाला तसे शासन निर्णय काढायला लावले आहेत.तसेच खून प्रकरणातील३९कुटुंबीयांना शासकीय नोकरी लाऊन त्यांचे यशस्वी पुनर्वसन देखील केले आहे.त्यामुळे पुन्हा एकदा वैभवजी गिते या स्वाभिमानी व निस्वार्थी वादळाची चर्चा महाराष्ट्रात सुरू आहे.

# धनगर समाजाच्या वतीने तब्बल दोन तास रास्ता रोको. रस्त्यावर सोडली मेंढरं आरक्षण भेटत नाही तोपर्यंत मतदान नाही धनगर समाजाचा निर्धार




चाकूर / सुशिल वाघमारे :- चाकूर तालूका धनगर समाजाच्या वतिने अनुसूचित जमातीची (एस.टी.) आरक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी दि.११ रोजी चाकूर येथील जुने बसस्थानक येथे तब्बल दोन तास रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेत धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे (एस.टी.) आरक्षण दिलेले आहे.त्याची अंमलबजावणी आजतागायत कोणत्याही राजकीय पक्षांनी केलेली नाही.जवळ जवळ सर्वच पक्षांनी धनगर समाजाला आरक्षण देण्यास टाळाटाळ केली आहे.त्यामुळे जोपर्यंत आरक्षण नाही तोपर्यंत मतदान नाही.जर घटनेतील तरतुदी प्रमाणे धनगर समाजाच्या अनुसूचित जमातीच्या (एस.टी.) आरक्षणाची तात्काळ अंमलबजावणी केली नाही तर महाराष्ट्रभर रस्त्यावर उतरून धनगर समाजाच्या आरक्षणाचे यापेक्षाही तिव्र आंदोलन करू असा इशारा देण्यात आला.

जोपर्यंत धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण भेटत नाही तोपर्यंत कोणत्याही राजकीय पक्षाला मतदान करणार नाही,आपण निवडून दिलेल्या महाराष्ट्रातील आमदार व खासदार यांनी धनगर समाजाच्या आरक्षणाच्या अंमलबजावणीची मागणी संसदेत करावी अशीही मागणी यावेळी करण्यात आली.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक सुरेश शेवाळे यांनी केली तर गणेशदादा हाके,ॲड.माधवराव कोळगावे,गंगाधर केराळे,दयानंद सुरवसे,शिवाजी देवकत्ते,दिनकर बडुरे,अशोक करडिले,लहू कोरे,नारायण राजुरे,लिंबराज केसाळे,संभाजी बैकरे,अमर देवकत्ते,अँड.ज्ञानोबा हाके आदी समाज बांधवांनी आरक्षणासंदर्भात मार्गदर्शन केले.यावेळी पोलीस प्रशासनाच्या वतीने चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तहसीलदार यांना धनगर समाजाच्या वतीने निवेदन देण्यात आले.यावेळी चाकूर तालुक्यातील धनगर समाज बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# डाएट कसं सुरू करायचं ?

अनेकदा आजूबाजूच्या आपल्याच माणसांमुळे आणि त्यांच्या खाण्याबद्दलच्या बेफिकीर किंवा अज्ञानातून विचार करण्याच्या पद्धतीमुळे खाण्याची शिस्त मोडल्याचे किंवा खाण्याची शिस्त आपलीशी करणाऱ्यांचे मानसिक खच्चीकरण झाल्याचे पाहायला मिळते. १. मायरा माझ्यासमोर बसून सांगत होती. मला आवडत नाही पाणी प्यायला. सारखी शू लागते आणि मला पाणी प्यायला नको वाटतं . घरी पीते मी आणि मला नाही लागत तितकी तहान. पण मायरा शरीरात पाणी कमी आहे बाळा त्यासाठी पाणी प्यायला हवं. यावर एक मोठा पोज घेऊन मायरा म्हणाली ,शाळेत सगळे खूप हसतात. शूसाठी वॉशरूमला जायचं म्हटलं तरी . आय हेट इट २. संध्याकाळी मी पाव भाजी , वडा पाव , समोसे, दाबली यापैकी काही खाऊ शकते का? ऑफिसमध्ये नाही म्हणवत नाही. सगळ्यांसोबत काहीतरी खरंच लागतं ३. माझं क्षेत्र असं आहे ना कि क्लाएन्ट समोर असेल तर थोडं अल्कोहोल होतंच. त्यामुळे दारू पूर्ण बंद होणं अवघड आहे आणि तसंही फक्त शनिवार रविवार पिणं होतं. सगळे दिवस नाही ४. अरे बापरे तू साखर बंद केलीयेस का? एक दिवस खाऊन काही ना नाही होत रे तू बिनधास्त खा .५. मित्रांनी चिट डे म्हणून कन्व्हिन्स केलं आणि नको नको म्हणता म्हणता पिझ्झा , फाइड चिप्स ,कोक सगळंच झालं आणि गेले ३ दिवस सगळं विस्कटलंय . इतका गिल्ट आलाय मला ६. एक दिवस साखरेचा चहा पिऊन काही होत नाही रे . बाकी दिवस आहेच नो शुगर :७. तू रोज सकाळी ५ वाजता उठतो? आमचे १० वाजले तरी डोळे उघडत नाहीत ८. तुला दुधाची अलर्जी आहे ? भलतंच काहीही. मी बघ रोज २ ग्लास दूध सायीसकट पितो. काही होत नसतं ९. वजन कमी झालंय ते उत्तम आहे. आता पुन्हा वाढणार नाही याकडे लक्ष द्या नाहीतर आहे आपलं तेच १०. जानेवारीपासून माझं सगळं नीट सुरु होतं. आताशा मन उडाल्यासारखं वाटतं खाण्यावरून आणि भीतीच वाटत राहते. खातोय ते चांगलं असेल का ? याने फॅट्स वाढतील का ? काहीही खायचं म्हटलं तरी दडपण येतं .या प्रकारचे संवाद आपल्या आजूबाजूला घडत असताना आपण हमखास ऐकतो. आहारतज्ज्ञांसाठी हे संवाद सवयीचेच ! आहार नियमन म्हटलं कि त्यासाठी आपण घडविण्यात आलेल्या बदलामुळे किंवा आहाराच्या शिस्तीला नवीन फॅड किंवा हे काय भलतंच असं म्हणणारा एक वर्ग आपल्या भोवताली असतो जोपर्यंत शरीरावर गांभीर्याने परिणाम होत नाही तोपर्यंत आहाराची, व्यायामाच्या भोवतालची माणसं गांभीर्याने विचार करताना दिसत नाहीत. अनेकदा आजूबाजूच्या आपल्याच माणसांमुळे आणि त्यांच्या खाण्याबद्दलच्या बेफिकीर किंवा अज्ञानातून विचार करण्याच्या पद्धतीमुळे खाण्याची शिस्त मोडल्याचे किंवा खाण्याची शिस्त आपलीशी करणाऱ्यांचे मानसिक खच्चीकरण झाल्याचे पाहायला मिळते.अनेकदा दोस्तांच्या कॅम्पमध्ये चिट मिलचे दिवस वाढवून पथ्य राहून गेले किंवा अतिरिक्त




खादाडी झाल्याचे किस्से ऐकायला मिळतात. आपल्या शिस्तीचा इतरांना कमी त्रास व्हावा असे प्रत्येकाला वाटत असते. शिवाय आपल्या शिस्तीचं हसं होण्याची सुप्त भीती मनात असते. याच मानसिकतेमधून काहीजण खाणं बंद करतात. जेवण सोडणे, आदल्या दिवशी गोड खाल्ल्याची शिक्षा म्हणून दुसऱ्या दिवशी कारल्याचा रस पिणे. किंवा पूर्ण दिवस उपाशी राहणे किंवा जिममध्ये २ तास जास्तीचा धावण्याचा व्यायाम करणे. असे अनेक उपाय तत्परतेने केले जातात. आहाराचा पहिला नियम आहे तो म्हणजे तुम्ही जे अन्न खाताय त्याने तुम्हाला उल्हसित आणि आनंदी वाटायला हवं. आपल्या शरीरात काही हॅपी हार्मोन्स (संप्रेरके) असतात. आपल्या खाण्याचा आणि या संप्रेरकांचा जवळचा संबंध आहे. फळ, हिरव्या भाज्या, हळद, दालचिनी यासारखे पदार्थ या संप्रेरकांचे योग्य संतुलन साधण्यासाठी मदत करतात. शिवाय माफक खाणे मात्र आवश्यक प्रमाणात खाणे यामुळे या संप्रेरकांचे कार्य आणखी सुरळीत होते. आहाराबाबत सगळ्यात जास्त दुर्लक्षित असणारी गोष्ट म्हणजे झोप. तुमची झोप पूर्ण आणि शांत असेल तर शारीरिक क्रिया अधिक कार्यक्षम होतात. चयापचय क्रियेचा वेग सक्षम करण्यासाठी करीत कमी मानसिक ताण आणि शांत झोप अत्यावश्यक आहेत. मानसिक ताणतणाव जास्त असेल तर खाण्याच्या सवयींवर परिणाम होतात. उदा अन्न त्याग करणे , कमी पाणी पिणे , खूप गोड खाणे , सातत्याने चहा पिणे , सिगारेटचं सातत्याने सेवन करणे , दारू पिण्याचे प्रमाण वाढणे.या सवयीमुळे शशरीरातील पोषणमूल्ये कमी होऊ लागतात आणि आपण एका दुष्टचक्रात अडकून जातो. हळूहळू शरीरात संथपणा येतो. आणि आपण आपल्याच संथपणा गुरफटून जातो. उत्साह वाढविण्यासाठी पुन्हा सध्याच्या काळात सोशल मीडिया, सातत्याने नवनवीन गोष्टी पाहण्यासाठी उपलब्ध असलेल्या सामाजिक माध्यमांवर अवलंबून राहतो. आकडा उत्साह वाढविण्यासाठी वेगवेगळ्या गोळ्या घेतल्या जातात आणि या सगळ्यात शरीरावर आणि मनावर काम करण्याचा वेळ वायुवेगाने निघून जातो. प्रत्यक्ष आयुष्यात डोकावल्यावर लक्षात येतं. मला ॲसिडिटी खूप होतेय केस गळती सातत्याने होतेयमला झोपच येत नाही अरे माझं वजन अतिरेकी वाढलाय किंवा जास्तच कमी झालंय किंवा माझं व्हिटॅमिन कमी झालंय डोळ्याखाली काली वर्तुळवाढली आहेत मला खूप थकवा येतोय, पाय सातत्याने दुखतायत.मग व्हिटॅमिन कमी झाले म्हणून गोळ्या घेणे सुरु होते आणि या सगळ्यात आहारविहाराच्या मूलभूत मुद्द्यांवरून दूर होतो. मानसिक आरोग्य आणि आहार यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. कारण मन आणि मेंदू यांचा मेळ आहाराचे गणित सहज सोडवू शकतो. वय वर्ष २५ ते ४५ या वयोगटातील स्त्रियांमध्ये झोप न लागल्याचं सर्रास पाहायला मिळतं. दिवसभराच्या कामाचं रहाटगाडगं सांभाळताना किमान एक वेळ जेवण स्वतःच्या वेगाने खाणे एवढी शिस्त आणि सुख प्रत्येकाने अवलंबायला हवं. आपल्या आहाराबद्दल सद्भावना असणं. उपलब्ध असणाऱ्या पिण्याच्या पाण्याचा वार करणं (विशेषतः स्त्रियांनी पाणी पिण्याकडे लक्ष द्यायलाच हवं) योग्य पाण्याचे प्रमाण केवळ शरीर नव्हे तर मानसिक स्वास्थ्य साठी देखील उपयुक्त आहेत .कोणीही लठ्ठ व्यक्ती व्यायाम करू लागली किंचा व्यायामाचे पथ्य करू लागली तर त्यांना प्रोत्साहित करणे आवश्यक आहे हे समाज म्हणून मान्य करायलाच हवे . .जितक्या सहज आपण पाश्चात्य जीवनशैली स्वीकारताना तिरक्या सहज आपण भारतीय खाद्यपदार्थांबाबत सजग असणं आवश्यक आहे. भारतीय आहारातील विविध फळे , भाज्या, मसाल्याचे विविध पपदार्थ मानसिक आरोग्यासाठी प्रसिद्ध आहेत. रोजच्या वापरतील पेरू, करवंद, सीताफळ , लिंबू, सफरचंद यांसारखी फळ हळद, दालचिनी, दगड फुल , जायफळ , केशर यासारखे पदार्थ आनंदी संप्रेरकांसाठी अत्यंत गुणकारी आहेत.

# बटाटा, भात खाऊनही ब्लड शुगरवर अंकुश कसा ठेवाल? त्यांना रेसिस्टंट स्टार्चमध्ये बदलण्यासाठी काय करावे?

डॉ मोहन डायबिटीज स्पेशालिटी सेंटरचे अध्यक्ष डॉ व्ही मोहन यांनी इंडियन एक्सप्रेसला दिलेल्या माहितीनुसार रेसिस्टंट स्टार्चचे प्रकार व तुम्ही तुमच्या आहारात या स्टार्चचे प्रमाण कसे वाढवाल याविषयी जाणून घेऊया.. डायबिटीस असलेल्या रुग्णांनी भात व बटाट्याचे सेवन टाळण्याचा सल्ला अनेक तज्ज्ञ देतात. बहुसंख्य लोकांना हेच दोन पदार्थ आवडीचे असल्याने त्यांना आहारातून वगळणे अत्यंत कठीण वाटते. अशा मंडळींची कार्ब्सची गरज व इच्छा पूर्ण करण्यासाठी रेसिस्टंट (प्रतिरोधक) स्टार्च एक आदर्श पर्याय ठरू शकतो. रेसिस्टंट (प्रतिरोधक) स्टार्च हा कार्ब्सचाच प्रकार आहे जो आतड्यांमध्ये पचत नाही ज्यामुळे तो रक्तात शोषला जाण्याचा वेग मंदावतो.मधुमेह असलेल्या व्यक्तींसाठी हा एक आदर्श पर्याय असण्याचे कारण म्हणजे त्याचा रक्तातील ग्लुकोजच्या पातळीवर कमीतकमी प्रभाव पडतो. इतर कार्ब्सप्रमाणे पचन होण्याऐवजी, हा स्टार्च मोठ्या आतड्यात जातो जिथे तो पचन न झाल्याने आंबतो आणि प्रीबायोटिक म्हणून काम करतो, अशा प्रकारचे चांगले बॅक्टेरिया शरीरात इन्सुलिनची संवेदनशीलता सुधारण्यास मदत करतात. डॉ मोहन डायबिटीज स्पेशालिटी सेंटरचे अध्यक्ष डॉ व्ही मोहन यांनी इंडियन एक्सस्प्रेसला दिलेल्या माहितीनुसार रेसिस्टंट स्टार्चचे प्रकार व तुम्ही तुमच्या आहारात या स्टार्चचे प्रमाण कसे वाढवाल याविषयी जाणून घेऊया.. प्रतिरोधक स्टार्चचे प्रकार कोणते आहेत? (थहर्री –ीश ढूंशी ठशीळीींरपीं डींरीलह)

प्रकार १ रेसिस्टंट स्टार्च: संपूर्ण किंवा अंशतः दळलेले धान्य, बिया आणि शेंगांमध्ये हा स्टार्च आढळतो. या पदार्थांमध्ये संरक्षणात्मक बाह्य स्तर असतो जो पचनास प्रतिकार करतो. जसे की ब्राऊन राईस, ओट्स, बीन्स आणि मसूर यांचा समावेश आहे.

टाईप २ रेसिस्टंट स्टार्च: बटाटे आणि केळीसारखे पिष्टमय पदार्थ शिजवले जातात आणि नंतर वापरण्यापूर्वी थंड केले जातात तेव्हा त्यात या पद्धतीचा स्टार्च तयार होतो.

प्रकार ३ रेसिस्टंट स्टार्च: जेव्हा ब्रेड किंवा पास्तासारखे काही पिष्टमय पदार्थ शिजवले जातात आणि नंतर वापरण्यासाठी थंड केले जातात तेव्हा सुद्धा कूलिंग प्रक्रियेमुळे कार्बोहायड्रेट्सच्या संरचनेत बदल होऊन ते पचनास अधिक प्रतिरोधक बनतात.

प्रकार ४ रेसिस्टंट स्टार्च: हे नैसर्गिकरित्या अन्नामध्ये नसून रासायनिक प्रक्रियेद्वारे तयार केले जाते. पाव आणि ब्रेड यांसारख्या प्रक्रिया केलेल्या खाद्यपदार्थांमध्ये हे सामान्यतः मिश्रित असते.

आहारात रेसिस्टंट स्टार्चचा समावेश कसा कराल? (कुे ढे खपलर्श्रीवश ठशीळीींरपीं डींरीलह)

उकडलेले चणे /राजमा/डाळी: या शेंगा फायबरने समृद्ध असून त्यांचा ग्लायसेमिक इंडेक्स देखील कमी आहे, ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यासाठी ते आदर्श आहेत.

कच्ची केळी: हिरव्या किंवा कच्च्या केळ्यांमध्ये प्रतिरोधक स्टार्च जास्त प्रमाणात असते.

संपूर्ण धान्य: ब्राऊन राईस आणि क्विनोआसारखे संपूर्ण धान्य देखील प्रतिरोधक स्टार्चचे चांगले स्रोत आहेत. रिफाईंड धान्याऐवजी संपूर्ण धान्याचा पर्याय निवडल्याने अधिक पोषक तत्वे मिळतात आणि रक्तातील ग्लुकोजच्या पातळीचे नियमन करण्यात मदत होते.

सीड्स: तुमच्या आहारात चिया सीड्स आणि फ्लॅक्ससीड्स सारख्या बियांचा समावेश केल्याने ओमेगा-३ फॅटी ॲसिड व फायबरसहित रेसिस्टंट स्टार्च सुद्धा शरीराला मिळतात.

अन्न शिजवा आणि थंड करा: बटाटे किंवा तांदूळ सारखे पिष्टमय पदार्थ शिजवताना, ते खाण्यापूर्वी थंड होऊ द्या. ड़ पीठ किंवा कॉर्न स्टार्च सारख्या पारंपारिक घट्ट पदार्थांऐवजी, सूप, ग्रेव्ही आणि सॉस घट्ट करण्यासाठी हिरव्या केळीचे पीठ किंवा ॲरोरूट पावडर वापरून पहा.

आहारात रेसिस्टंट स्टार्चसाठी हे नियम लक्षात ठेवा (ठशीळीींरपीं डींरीलह ठींश्रशी)

लक्षात घ्या, जर आपल्याला अगोदरच मधुमेहाचा त्रास असेल तर, दिवसभर आपल्या रक्तातील साखरेची पातळी नियमितपणे तपासणे महत्वाचे आहे, विशेषत: आपल्या आहारात नवीन पदार्थ समाविष्ट करताना आधी कमी प्रमाणात सुरुवात करा व मग हळूहळू वाढवा. ज्यामुळे शरीराला नवीन पदार्थांशी जुळवून घ्यायला वेळ मिळेल व अचानक ब्लड शुगर वाढणार नाही. एकाच वेळी मोठ्या प्रमाणात प्रतिरोधक स्टार्च खाण्याऐवजी, दिवसभर टप्प्याटप्प्याने त्याचे समान प्रमाणात वितरित करा, अन्न शिजवण्याची पद्धत बदला, साखर किंवा तेल घालून तळणे बेक करणे यापेक्षा वाफवणे किंवा उकळणे हे पर्याय अधिक वापरा. प्रत्येकाचे शरीर वेगवेगळ्या प्रकारे प्रतिक्रिया देते. तुमची रक्तातील साखर कशी वाढते याचा मागोवा ठेवा आणि त्यानुसार प्लॅन करा.

# आयआरइएफच्या ( IREF ) संचालक पदी पृथ्वीराज पाटील यांची निवड.



लातूर :- रिअल इस्टेट,बांधकाम व फायनान्स क्षेत्रातील देशातील नामांकित शैक्षणिक संस्था खठएऋ (आय आर इ एफ ग्लोबल ) च्या संचालक पदी लातूरचे भूमीपुत्र पृथ्वीराज मोहनराव पाटील यांची निवड झाली आहे.मूळचे निलंगा तालुक्यातील जाजनूरचे रहिवासी असलेले पृथ्वीराज पाटील हे पुणे,मुंबई व बारामती येथील रिअल इस्टेट व बांधकाम क्षेत्रात कार्यरत आहेत. खठएऋ ही संस्था मागच्या पंधरा वर्षांपासून रियल इस्टेट,बांधकाम व फायनान्स या क्षेत्रात काम करते.रियल इस्टेट बांधकाम क्षेत्रात देशभरात लागू करण्यात आलेल्या रेरा कायद्याच्या निर्मिती प्रक्रियेत या संस्थेचे मोलाचे योगदान राहिले आहे. आयआरइएफ या संस्थेचे पुणे व दुबई येथे मॅनेजमेंट कॉलेज असुन भारतातील विविध शहरांमध्ये प्रशिक्षण शाखा आहेत.२०१० पासून संस्था विद्यार्थी व प्रोफेशनलस यांना चइ-, झककऊ,पोस्ट ग्रॅज्युशन डिप्लोमा उळीींरपलश लर्निंग व भिन्न प्रकारचे शॉर्ट टर्म कोर्सेस शिकवते. जगभरातील ३६ देशातील विद्यार्थ्यांनी आत्तापर्यंत संस्थेतून शिक्षण घेतले आहे. आयआरइएफ च्या शिक्षणानंतर रिअल इस्टेट, बांधकाम व फायनांस क्षेत्रात काम करणाऱ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये हमखास नोकरी मिळते हे या संस्थेचं वैशिष्ट्य मानलं जातं. सदरील निवडीबाबत पृथ्वीराज पाटील यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील कु. आरती करडेचा सत्कार



लातूर दि. ११.१०.२०२३ श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थ, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील क्रीडा विभागातील कु. आरती करडे हिने जिल्हा क्रीडा संकुल, लातूर येथे सुरू असलेल्या शालेय जिल्हास्तरीय महानगरपालिका अंतर्गत मैदानी क्रीडा स्पर्धेमध्ये ७.९५ मि. गोळा फेक करून १९ वर्षाखालील मुलींच्या क्रीडा प्रकारात सर्वप्रथम क्रमांक पटकाविला. तिच्या या उज्वल यशाबद्दल महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. शिवशंकरप्पा बिडवे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. नल्ला भास्कर रेड्डी आणि प्रा. आशिष क्षीरसागर यांची उपस्थित होती. तसेच श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सर्व संस्था पदाधिकारी, प्रभारी प्राचार्य, उपप्राचार्य, एच.एस.सी.व्होकेशनल कोर्सचे उपप्राचार्य प्रा.बालाजी जाधव व सर्व शिक्षक, समन्वयक, पर्यवेक्षक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि क्रीडा विभागातील विद्यार्थ्यांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

# देवणी गोवंश संशोधन केंद्र अंबाजोगाईलाच!

लातूर : प्रतिनिधी लातूर जिल्ह्यातील देवणी येथे देवणी गोवंशाचे मूळ असून त्या देवणी गोवंशाचे जतन व संवर्धन करण्याचे काम लातूर जिल्ह्यातच होणे गरजेचे आहे. पण ते आता बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यातील साकुड येथे होणार आहे. तसा शासन निर्णय ही बुधवारी कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाकडून जाहीर करण्यात आला आहे. तशा शासन आदेशही पारीत केला गेला आहे. हे पाहता कृषी मंत्री धनंजय मुंडे हे लातूरच्या सत्ताधारी लोकप्रतीनिधीवा भारी



पडल्याचे सपष्ट होत असून जिल्हावासीयांचे आता लातूर जिल्ह्यातील सत्ताधारी लोकप्रतिनिधींच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे.देवणी गोवंश संशोधन केंद्रांची लातूर जिल्हावासीयांची मागणी तशी जुनीच आहे. पण मागच्या महिन्यात छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेल्या मंत्रीमंडळ बैठकीत विद्यमान कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनीदेवणी गोवंश संशोधन केंद्र व या प्रमाणेच लातूरकरांच्या जिव्हाळ्याचा विषय असलेल्या सोयाबीन संशोधन केंद्राची मागणी केली अण लातूर जिल्ह्यात तीव्र संताप व्यक्त करत विरोध करण्यात आला पण लातूरच्या स्ताधारी लोकप्रतिनिधीवर भारी पडत कृषी मंत्री धनंजय मुंडे आपली मागणी पुर्नत्वास नेली असून शासनाने तसा शासन निर्णय ही बुधवारी कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाकडून जाहीर करण्यात आला आहे. तशा शासन आदेशही पारीत केला गेला आहे. आता लातूर जिल्ह्यातील सत्ताधारी लोकप्रतिनिधी कोणती आता कोणती भूमिका घेतात, याकडेच जिल्हावासीयांचे लक्ष लागले आहे. लाल कंधारी ही अंबाजोगाईलाच देवणी गौवंशा प्रमाणेच मराडवाड्यात असतित्व असलेल्या लाल कंधारी गौवंशाचे मुळ हे नोदेड जिल्ह्यातील कंधार येथील असताना कंधार व नांदेड जिल्हावासीयांचा ही लातूरकंरा प्रमाणेच विरोध असताना आता लालकंधारी गौवंशाचे पशुपैदास संवर्धन अंबाजोगाई तालुक्यातील साकुड येथे होणार आहे.

# ‘लाडक्या लेकी’च्या सक्षमीकरणासाठी महायुती सरकारची संरक्षणाची सावली!

## भाजप महिला आघाडीतर्फे उपमुख्यमंत्री फडणवीस यांचे अभिनंदन

लातूर - राज्याच्या सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेली लेक लाडकी योजना राज्यात लागू करण्याचा निर्णय महायुती सरकारच्या मंत्रिमंडळ बैठकीत झाल्याने महिला सक्षमीकरणाच्या महाराष्ट्राच्या परंपरेत मानाचा नवा तुरा खोवला गेला आहे. केवळ कागदी धोरणे आणि वारेमाप घोषणा करण्याची परंपरा मोडीत काढून घोषणांची अंमलबजावणी करणाऱ्या महायुती सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे राज्यातील असंख्य गरीब कुटुंबांतील मुलींचे भविष्य उजळणार आहे, असा विश्वास भाजप महिला आघाडीच्या लातूर शहर जिल्हाध्यक्ष सौ.रागिणी यादव यांनी व्यक्त केला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वित्तमंत्री या नात्याने राज्याचा अर्थसंकल्प सादर करताना ‘लेक लाडकी’ योजनेचा तपशील जाहीर केला होता. आंतरराष्ट्रीय कन्या दिनाच्या पूर्वसंध्येस आणि दुर्गा उत्सवाच्या पार्श्वभूमीवर ही योजना जारी करून देवेंद्र फडणवीस यांनी या संकल्पाची पूर्तता केली आहे, असे त्या म्हणाल्या. मुलींच्या सक्षमीकरणासाठी आणि गरीब कुटुंबांतील मुलींना लखपती बनवून स्वतःच्या क्षमतेवर शिक्षणाच्या सर्व संधी प्राप्त करता याव्यात यासाठी आखलेल्या या योजनेद्वारे वयाच्या १८ व्या वर्षी मुलीच्या खात्यात एक लाखांपर्यंतची रक्कम जमा करण्यात येणार आहेत. महिलांना एसटी प्रवासात पन्नास टक्के सवलत देण्याच्या क्रांतिकारी निर्णयामुळे राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणाचा मोठा टप्पा गाठला गेला आहे. केंद्रातील मोदी सरकारने अलीकडेच महिलांना राजकीय आरक्षण जाहीर करून समान संधींचे वचन पूर्ण केले आहे. लेक लाडकी योजनेमुळे राज्यातील गरीब कुटुंबात जन्माला येणाऱ्या कोणत्याही मुलीच्या शैक्षणिक प्रगतीत आर्थिक अडचणीचा अडथळा येणार नाही. भावी पिढीतील मुलींच्या सक्षमीकरणाची दमदार प्रक्रिया लेक लाडकी योजनेतच्या क्रांतिकारी अंमलबजावणीतून सुरू झाली आहे,



असे सौ.रागिणी यादव म्हणाल्या. महाराष्ट्राच्या लेकींना आत्मनिर्भर करणारी ही दूरदर्शी योजना आखल्याबद्दल राज्यातील महिलावर्गाच्या वतीने आपण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करतो, असे ही त्या म्हणाल्या. पिवळ्या व केशरी रेशनकार्डधारक कुटुंबात मुलीचा जन्म झाल्यावर ५ हजार रुपये, इयत्ता पहिलीत गेल्यावर ६ हजार रुपये, सहावीत गेल्यावर ७ हजार रुपये, ११ वीत गेल्यावर ८ हजार रुपये, १८ वर्षे पूर्ण झाल्यावर ७५ हजार रुपये, अशा रितीने एकूण त्या मुलीस १ लाख १ हजार रुपये एवढा लाभ मिळेल. शासनामार्फत थेट लाभार्थी हस्तांतरण (उइढ) द्वारे लाभाची रक्कम लाभार्थ्यांना अदा करण्यात येणार आहे. १ एप्रिल २०२३ नंतर कुटुंबात जन्मणाऱ्या १ अथवा २ मुलींना त्याच प्रमाणे १ मुलगा व १ मुलगी असल्यास मुलीला या योजनेचा लाभ मिळेल. दुसऱ्या प्रसुतीच्या वेळी जुळी अपत्ये जन्माला आल्यास त्यापैकी १ मुलगी किंवा दोन्ही मुली असल्यास दोघींना या योजनेचा लाभ मिळेल, अशी माहितीही श्रीमती रागिणी यादव यांनी यावेळी दिली.

# संभाजी महाविद्यालयात इंग्रजी वाङ्मय मंडळाचे गठन

मुरुड /महेंद्र आल्टे : येथील संभाजी महाविद्यालयात इंग्रजी वाङ्मय मंडळामार्फत दर्जेदार व विद्यार्थी - विद्यार्थिनींना उपयुक्त कार्यक्रम वर्षभर राबवले जातात .सन २०२३ -२४ या वर्षाकरिता मंचाचे गठन करण्यात आले आहे. इंग्रजी वाङ्मय मंडळाचे अध्यक्ष म्हणून कु. अनुराधा क्षीरसागर (बी.ए. तृतीय), तर सचिव या पदावर कु. पल्लवी भागवत (बी.ए. द्वितीय) या विद्यार्थिनीची निवड करण्यात आली आहे. स्नेहा चव्हाण, सन्ना सय्यद, आकाश कसपटे, वैभव देशमुख, उन्नती केवळराम यांची सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.डॉ.सौ. मीना कदम यांनी विद्यार्थी - विद्यार्थिनींना



इंग्रजी वाङ्मय मंडळाविषयी सविस्तर माहिती दिली .तसेच इंग्रजी विभागाचे प्रा .एम .बी .गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले यावेळी प्राचार्य डॉ.ए.के .पिडगे आणि प्रा.राहुल पवार यांच्यासह बहुसंख्य विद्यार्थी -विद्यार्थीनी उपस्थित होते.

# ‘दिव्यांग मतदारांची नोंदणी’साठी प्रत्येक तहसील कार्यालयात १३ ऑक्टोबर रोजी विशेष शिबीर

लातूर (जिमाका) : दिव्यांग नागरिकांच्या मतदार नोंदणीसाठी जिल्ह्यातील प्रत्येक तहसील कार्यालयामध्ये शुक्रवार, १३ ऑक्टोबर, २०२३ रोजी विशेष मतदार नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या मतदार नोंदणी शिबिरात पात्र दिव्यांग नागरीकांनी आपला सहभाग नोंदवून ‘दिव्यांग मतदारांची नोंदणी’चा उपक्रम यशस्वी करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले आहे. भारत निवडणूक आयोग व राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्यामार्फत १ जानेवारी २०२४ या दिनांकावर आधारित मतदार याद्याचे संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत मतदार यादीत १८ ते १९ वयोगटातील व्यक्तींची नोंदणी करणे, महिला मतदार यांची नोंदणी करणे, तृतीयपंथी मतदरांची नोंदणी करणे तसेच दिव्यांग व्यक्तीची मतदार यादीत नोंदणी करण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. या अनुषंगाने लातूर जिल्ह्यामध्ये ऑक्टोंबर महिन्यातील प्रत्येक आठवड्यात विशेष मतदार नोंदणीचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यांतर्गत १३ ऑक्टोबर, २०२३ रोजी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे यांनी संपूर्ण जिल्ह्यामध्ये ‘दिव्यांग मतदारांची नोंदणी’ उपक्रम राबविण्याच्या सूचना केल्या आहेत.

# लातूरची माती दिल्लीला जाणार अमृत कलश यात्रेनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम

लातूर/प्रतिनिधी:मेरी माटी मेरा देश उपक्रमा अंतर्गत लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने संकलित करण्यात आलेली माती दिल्ली येथे जाणार आहे.यासाठी आयोजित अमृत कलश यात्रेनिमित्त गुरुवार दि.१२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता लोकनेते विलासराव देशमुख (नाना-नानी) पार्क येथे सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत मेरी माटी मेरा देश हा उपक्रम दि.१ सप्टेंबर ते १ नोव्हेंबर या कालावधीत राबविण्यात येत आहे.या कालावधीत अमृत कलश यात्रा आयोजित करण्याच्या सूचना केंद्र सरकारच्या सांस्कृतिक विभागाने दि.२० सप्टेंबर रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून झालेल्या बैठकीत देण्यात आल्या होत्या.त्या अंतर्गत मनपाच्या वतीने शहरातील ए,बी,सी व डी या चारही झोनमधील घराघरातून माती गोळा करण्यात आली आहे. अमृत कलश यात्रेत संकलित करण्यात आलेली माती दिल्ली येथे जाणार आहे.तत्पूर्वी दि.२७ ऑक्टोबर रोजी मुंबईतील क्रांती मैदान येथे मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री, सांस्कृतिक कार्यमंत्री, विरोधी पक्षनेते,संसद सदस्य,विधिमंडळ सदस्य, मुख्य सचिव आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न होणार आहे.

दि.३० ऑक्टोबर रोजी दिल्ली येथील कर्तव्यपथावर अंतिम पूर्व सोहळा होणार असून या सोहळ्यास पंतप्रधान उपस्थित राहणार आहेत. अमृत कलश दिल्ली येथे घेऊन जाण्यासाठी मनपाच्या वतीने विधी विभाग प्रमुख समाधान सूर्यवंशी,भांडारपाल बालाजी शिंदे व लिपिक हनुमंत जाधव यांना आदेशित करण्यात आले आहे.यापूर्वी गुरुवार दि.१२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता लोकनेते विलासराव देशमुख पार्क येथे सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

# कलावंतांनी बाबासाहेबांना मांडताना महाकवी वामनदादा कर्डक यांचा आदर्श घ्यावा - आनंदराव आंबेडकर

मुंबई / प्रतिनिधी :- कलावंतांनी आंबेडकर चळवळ खेड्यापाड्यात मांणसामांणसात पोहोचवली, जोपासली व आजपर्यंत जिवंत ठेवली म्हणून मला खऱ्या अर्थाने कलावंताचा सार्थ अभिमान आहे, म्हणूनच मी सर्व कलावंतांना धन्यवाद देतो परंतु चळवळीतील त्या काळातील गीते व आताची गीते यात तफावत जाणवत असल्याने मला खंत वाटते आहे, सध्याची परिस्थिती बदलली आहे याच ध्यान ठेवून कलावंतांनी बुद्ध आणि आंबेडकर यांचे विचार मांडताना अभ्यासपूर्वक कला सादर करीत महाकवी वामनदादा कर्डक यांचा आदर्श ठेवावा असे प्रतिपादन इंदू मिलचे प्रणेते, सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांनी सम्यक कोकण कला संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय काव्य स्पर्धेत प्रमुख पाहुणे म्हणून कलावंतांना संभोधित करताना केले. सम्यक कोकण कला या संस्थेच्या वतीने बहुजन चळवळीची दशा आणि दिशा या विषयावर प्रथमच राज्यस्तरीय काव्य स्पर्धेचे आयोजन माननीय मंदारजी कवाडे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, भोईवाडा, परेल, मुंबई - १२ येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले, सदर प्रसंगी कार्याध्यक्ष चिंतामण जाधव, माजी महासचिव रामदास तथा राजाभाऊ गमरे यांच्या शुभहस्ते ज्योत प्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरवात करण्यात आली, सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुकुंद तांबे यांनी केले तर विनोद धोत्रे यांनी प्रास्ताविक सादर केले त्यात त्यांनी संस्थेच्या २३ वर्षांची समृद्ध व वैभवशाली कारकीर्दिवर दृष्टिक्षेप टाकत भविष्यात येणाऱ्या नवीन उपक्रमांवर आपले विचार मांडले. सदर प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले जातिवंत कलाकार लक्ष्मण भगत (कार्याध्यक्ष बौध्दजन पंचायत समिती) त्यांच्या विद्यार्थीदशेपासून ते नोकरी, गृहस्थजीवन असा आपल्या जीवनावर प्रकाशझोत टाकत आयुष्यातील अनेक आठवणींना उजाळा दिला, त्याचबरोबर समाजसेवक पांडुरंग साळवी, उद्योगपती वीरेंद्र लगाडे, जेष्ठ कवी नाथा जाधव, हितवर्धक कला




संस्थेचे संतोष गमरे, भगवान साळवी, कार्याध्यक्ष सिद्धार्थ सारंगे (अध्यक्ष म्हसळा तालुका), शांतिदुत शिर्के, अनिल महिपत सावंत (दांडगुरी गाव), तुळशीराम शिर्के (बौध्दजन पंचायत समिती, शिक्षण समिती) आदींनी शुभेच्छापर आपले विचार व्यक्त केले. बहुजन चळवळीची दशा आणि दिशा या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय काव्य स्पर्धेत महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून अनेक कवी सहभागी झाले होते या स्पर्धेत परीक्षकांच्या कसोटीवर उतरत विनायक जाधव (म्हसळा तालुका) यांनी प्रथम क्रमांक, विजय पवार (चिपळूण) यांनी द्वितीय क्रमांक, सुरेश पवार (मंडनगड) यांनी तृतीय क्रमांक पटकावला तर संध्याताई गायकवाड (वसई) यांनी उत्तेजनार्थ पारितोषिकावर आपले नाव कोरले, विजेत्या व सहभागी सर्व कवींना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले, सदर स्पर्धा अटीतटीची झाली असून सर्वच कवींनी आपल्या कवितेने सभागृह गाजवले, सदर स्पर्धेस परीक्षक म्हणून प्राध्यापक डॉ. संजय खैरे, सिने लेखक दिग्दर्शक राजेश जाधव यांनी पारदर्शक काम केले. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सुभाष सावंत, सहसचिव प्रवीण मोहिते, जनार्दन काकडे, संजय गमरे, नंदकुमार पवार, नवनीत तांबे, सिद्धार्थ साळवी, मोहन थोरात, मीनाक्षीताई थोरात यांनी अथक परिश्रम घेतले सरतेशेवटी सर्वांचे आभार मानून सचिव नरेश शिंदे यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE